ISSN 2394-5303

GOLDEN JUBILEE YEAR 1967-2017

१९६६-२०१६

सुवर्ण महोत्सवी वर्ष

Printing Area UGC Jr.No.43053 UGC Approved Refereed Journal

Shri Balaji Sansthan, Deulgaon Raja's

**Shri Vyankatesh Arts, Commerce & Science College**

Deulgaon Raja, Dist. Buldana (M.S.), PIN- 443204.

NAAC RE-ACCREDITED AT 'B' LEVEL

Special Issue, December 2017

Printing Area™

International Multilingual Research Journal

IMPACT 4.002 iijif FACTOR



# Changing Trends & Issues in Indian Politics

(Volume : II)

Chief Editor:

**Dr. Anant Madan Awati**



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

December 2017, Special Issue

Shri Balaji Sansthan Deulgaon Raja's

**Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College,**

Deulgaon Raja, Dist. Buldana (M.S.) Pin :443204

NAAC RE-ACCREDITED AT 'B' LEVEL

# Changing Trends & Issues in Indian Politics

## (Volume : 2)

Chief Editor:

**Dr. Anant Madan Awati,**

Assistant Professor & Head, Dept. of Political Science,

Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College,

Deulgaon Raja, Dist. Buldana (M.S.) Pin :443204

Moblie : 9421395187/9545195875

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Sonpeth Pin-431516

## Board of Editors :

**Dr. Gajanan Jadhav**
(Principal, Shri Vyankatesh College, Deulgaon Raja)
**Dr. Anant Madan Awati**
(Assistant Professor & Head, Dept. of Political Science,
Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College, Deulgaon Raja)
**Dr. Sudhir D. Chavan**
(Assistant Professor & Head, Dept. of English,
Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College, Deulgaon Raja)
**Shri. Narendra H. Shegokar**
(Assistant Professor & Head, Dept. of Commerce,
Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College, Deulgaon Raja)
**Shri. R.H. Devare**
(Assistant Professor & Head, Dept. of History,
Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College, Deulgaon Raja)
**Shri. S.B. Jagtap**
(Assistant Professor, Dept. of Commerce,
Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College, Deulgaon Raja)
**Shri. D.V. Gore**
(Assistant Professor, Head, Dept. of Economics,
Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College, Deulgaon Raja)
**Shri. V.R. Bansile**
(Assistant Professor, Dept. of Commerce,
Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College, Deulgaon Raja)
**Shri. M.B. Jadhav**
(Assistant Professor, Dept. of Marathi,
Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College, Deulgaon Raja)
**Dr. Eknath B. Bhalerao**
(Assistant Professor, Dept. of English,
Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College, Deulgaon Raja)

Indexed
UGC Approved Journal ज्ञान-विज्ञान विमुक्तये UGC Jr.No.43053
IMPACT 4.002 iijif FACTOR
Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 3418002

**Note :** The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. 'Printing Area' dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute,academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)

http://www.printingarea.blogspot.com

Late Ramesh Warpudkar ACS College Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



50

# ग्रामीण राजकारणाचे बदलते स्वरूप

प्रा.डॉ. आंधळे बी.व्ही.,
राज्यशास्त्र विभाग, कै.रमेश वरपुडकर महा. सोनपेठ, जि.परभणी

## प्रस्तावना :—

भारत हा खेडयांचा देश आहे म्हणून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी 'खेडयाकडे चला' अशी हाक दिली. खेडयांचा विकास झाला तरच भारताचा विकास होईल असे त्यांना वाटत होते.प्राचीन काळी भारतातील खेडी राजकीयदष्टया स्वतंत्र, स्वावलंबी व समर्थ होती. परंतू ब्रिटीशकाळात खेडयांचे हे स्वावलंबन व स्वयंपुर्तता काही प्रमाणात कमी झाली.ब्रिटीशांनी शहरांना महत्व दिले. रेल्वे, रस्ते, तार पोस्ट या सारख्या विकासाच्या योजना शहरांमध्ये केल्या. १९४७ ला भारत स्वतंत्र झाल्यास खेडी स्वंयपुर्ण करण्यासाठी भारत सरकारने विविध प्रयत्न केले.त्यासाठी भारतीय लोकशाहीने सत्तेच्या विकेंद्रीकरणावर भर दिला. यासाठी त्रिस्तरीय पंचायती राज ची व्यवस्था ग्रामीण भागासाठी स्वीकारली. जिल्हा परिषद, तालुका पंचायत,व ग्राम पंचायत असे पंचायत राजचे प्रारूप स्विकारले. यामुळे खेडयाचे राजकीय परीवर्तन झाले. नव्या राजकीय नेतृत्वाची उभारणी झाली व खेडयाची पारंपारिक राजकीय संरचना बदलली.

सन १९५७ च्या बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनुसार सन १९५९ मध्ये पंचायतराज्याची प्रत्यक्ष अमंलबजावणी झाली.देशात सर्वप्रथम राजस्थान या राज्याने पंचायतराज पध्दतीचा स्विकार केला. त्यानंतर देशातील इतर राज्यानी ही पध्दती स्विकारली. महारष्ट्र हे पंचायत राज पध्दतीचा स्वीकार करणारे नववे राज्य आहे. मा. वसंतराव नाईक यांच्या समीतीच्या शिफारशी नुसार महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनीयम १९६१ संमत केला. आणि त्यानुसार १ मे १९६२ पासून महाराष्ट्रात या अधिनीयमाची अमलबजावणी सुरू झाली. सन १९९२ च्या ७३ व्या घटना दुरूस्तीने पंचायत राज्याची व्याप्ती वाढवली.भारतीय राज्यघटनेमध्ये भाग ९ समाविष्ट करून पंचायत राज्यांच्या कार्य अधिकारामध्ये सुधारणा करण्यात आल्या.त्यानुंसार स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना महाराष्ट्र सरकारने ५० टक्के आरक्षण दिले. यामुळे ग्रामीण राजकारणाचे स्वरूप अमुलाग्र बदलुन गेले.

## ग्रामीण समाजरचना :—

भारतीय ग्रामीण समाजरचना अभ्यासल्याशिवाय ग्रामीण राजकारणचे स्वरूप लक्षात येणार नाही. नैसर्गिक पर्यावरण, लोकसंख्या, व्यवसाय, आर्थिक स्थिती यासंबंधातील ग्रामीण समाजरचना शहरापेक्षा वेगळी अशी आहे. काळानुरूप ग्रामीण समाजरचनेत बदल होत गेला असला तरी ग्रामीण समाज म्हणून त्याची वैशिष्टे वेगळी अशीच आहेत. ग्रामीण समाज आजच्या अत्याधुनीक काळातही बराचसा पारंपारिक राहिला आहे.

ग्रामीण समाजरचनेचा पाया हा प्रामुख्याने शेती हाच राहिला आहे. तसेच जाती आधारित व्यवस्था हे ग्रामीण समाजाचे एक वैशिष्टये आहे. प्रत्येक गावात बारा बलुतेदार व अठरा आलुतेदार अशा जाती राहील्या आहेत. प्रत्येक जातीला नेमुन दिलेला व्यवसाय त्या जाती करतात. त्यामुळे गावाच्या वस्तुच्या व सेवांच्या गरजा गावातच भागतात ग्रामीण जीवन लहान आकाराचे आहे. त्यांचे परस्परांशी वारंवार संबंध येतात. त्यामुळे त्यांच्यात एकतेची व सामुहीकतेची भावना अधिक आढळते. परंतू आजच्या काळात खेडयांच्या समाज रचनेत बदल झालेले दिसून येत आहेत. औद्योगिकीकरणामुळे, नागरीकरणामुळे आणि आधुनिक शिक्षण व प्रचार व प्रसार माध्यमामुळे ग्रामीण समाजरचनेत बदल झाला आहे.

ग्रामीण समाजरचनेत आज छोटे कुटूंब व विभक्त कुटुंब पहायला मिळतात. टि.व्ही., मोबाईल, सोशल मिडीया, इंटरनेट, दळणवळणाची स्वयंचलीत साधने यांच्यामुळे खेडयांचे सामाजिक जीवन पार बदलुन गेले आहे. ग्रामीण समाजाच्या गरजा पुर्वी मर्यादित होत्या पण आज चैनीच्या गरजा वाढल्या आहेत. त्यामुळे

अशी अवस्था आहे की ग्रामीण स्तरावरिल नेतृत्व सुध्दा मिलीभगत करून योजनांची वाट लावत आहेत. ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाचा विचार करून तर आजही ग्रमीण भागात रस्ते. पाणी, वीज, शौचालय, पक्के घर, व्यायाम शाळा, यांच्यावर सरकार करोडो रूपये खर्च करत आहे पण या योजना यशस्वी होताना दिसत नाहीत. विकासाभिमुख राजकारणापेक्षा नकारात्मक राजकारण केल्यामुळे ग्रामीण महाराष्ट्राचा विकास होत नाही.

ग्रामीण राजकारणात आज जातीपातीच्या राजकारणा बरोबरच गुन्हेगारीकरणाचे राजकारण होत आहे. जिल्हा परिषद, पंचायात समितीसारख्या संस्थांचे सदस्य व्हायचे म्हटले तरी ते चांगल्या माणसाला होणे शक्य नाही. १९९० च्या दशका नंतर ग्रामीण महाराष्ट्राचे राजकरण पुर्णता बदलून गेले आहे. २०१२ च्या दुष्काळात २० हजारापेक्षा जास्त गावांमध्ये टॅकरने पाणीपुरवठा करावा लागला. जनावरासाठी छावण्या काढाव्या लागल्या. टपरी, खपरीने ग्रामीण तरूणांना व्यसनाधीन बनविले जात आहे. याशिवाय ग्रमीण संस्कृतीला शहरी रंगरूप देण्याचे कार्य सुदधा होत आहे यासाठी गणेश उत्सव, नवरात्र, अखंड हरिनाम सप्ताह, सण समारंभ साजरे करून ग्रामीण जनतेची संघटीत लुट केली जात आहे.

**संदर्भ :—**


१. भारतीय राज्यघटनेची ओळख — दुर्गा दास बसु
२. १९९२ चा संविधान कायदा — ७३ वी दुरूस्ती
३. १९९२ चा संविधान कायदा — ७४ वी दुरूस्ती
४. संसदीय लोकशाहीचे आयुधे — डॉ. अजय गव्हाणे
५. विसाव्या शतकातील महाराष्ट्र — य. दि. फडके
६. महाराष्ट्राचे राजकारण — सुहास पळशीकर


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani

51

# ग्रामीण भारताचा विकास – राजकीय धोरणे व शासकीय योजना

**कु. दिपाली श्रीराम घोगरे,**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
डॉ. एच.एन. सिन्हा कला व वाणिज्य महाविदयाल
पातूर, जि. अकोला.

भारत हा खेडयाचा देश आहे. भारताच्या ए लोकसंख्येच्या दोन तृतीअंश लोकसंख्या खेडया राहते. भारताच्या २०११ च्या जनगननेनुसार भार लोकसंख्या १२१ कोटी आहे. त्यापैकी ८३ कोटी लाखापेक्षा जास्त लोकसंख्या खेडयात राहते ही लोकसंख्या ६९ टक्के आहे. अर्थातच जोपर्यत ग्र विकास होणार नाही तोपर्यंत आपण भारताच्या विक कल्पना करणे चुकीचे ठरेल. महात्मा गांधी म्हणायचे की भारताची आत्मा गावामध्ये वास गावाच्या उन्नतीतुनच भारताची उन्नती होवू म्हणूनच देशाचा सर्वसमावेशक विकास करणे गरजेचे आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून ७० व होवूनही देशातील अनेक गावे विकासापासून क आहेत. १२ पंचवार्षिक योजना पूर्ण होवूनही विशेषत: ग्रामीण भागाची सर्वांगिण विकास झाल देश विकासाच्या वाटेने मार्गक्रमण करीत आ त्याकरीता सशक्त धोरणाची व योजनांची गरज

**भारतातील ग्रामीण जीवन :—** अ विकसित देशाच्या तुलनेत भारत एक प्राचि आहे. प्राचिन काळात भारतातील ग्राम स्वावलं त्याकाळात कृषी व उदयोग परिपक्व अवस्थेत अ खेडी स्वयंपूर्ण होती. गावामध्ये उत्पादन विनिमय, सुरक्षा, न्याय, मनोरंजन तसेच साम सांस्कृतिक जीवन याकरीता प्रत्येक गावाची अशी व्यवस्था होती. गावातील सर्व घटक अवलंबून होते. त्यामुळे त्यांचे जीवन परस्प

Sonpeth Pin-431516

झाला आहे. त्यातूनच शेतकऱ्यांच्या आत्महत्या महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनात होताना दिसत आहेत.

जीवनात आर्थिक ताण मोठयाप्रमाणात निर्माण

**ग्रामीण राजकीय व्यवस्था :—**

प्राचीन भारतात एकतंत्री, अनियंत्रित अशी राजवट आस्तित्वात होती असे काही इतिहास कारांचे मत आहे.तर १९२४ मध्ये हिदु पॉलिटी या ग्रंथात जयस्वाल म्हणतात प्राचिन भारतात ग्रीक व रोमन प्रजासत्ताकापेक्षा भारतातील गणराज्य प्रगल्भ होती. भारतीय राजांवर ग्रामसभा, ग्राम समिती, व जनपद यासारख्या स्थानिक लोकसंख्येचा अंकुश होता. रामकृष्ण मुखर्जी यांच्या मते, वैदिक काळापासुन मध्ययुगीन भारतात स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात होत्या.

ब्रिटीश काळात सन १९८२ मध्ये लॉर्ड रिमन यांनी सर्वप्रथम स्थानिक स्वराज्य संस्थांना व्यापक अधिकार दिले. १९०९,१९१९, व १९३५ च्या कायद्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांना काही अधिकार दिले. भारतीय स्वातंत्र आंदोलनादरम्यान रविंद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, विनोबा भावे यांनी वेळोवेळी स्थानिक स्वराज्य संस्थाचा पुरस्कार केला. म. गांधी यांनी आपल्या एकुण राजकीय तत्वज्ञानाचा पाया ग्राम स्वराज्य ही संकल्पना मानली आहे. पुढे भारतीय घटना परिषदेने राज्यघटनेच्या चौथ्या भागात म्हणजे मार्गदर्शक तत्वात त्याची तरतुद केली. यानुसार २ ऑक्टोंबर १९५८ मध्ये केंद्र सरकारने ग्रामीण भागासाठी त्रिस्तरीय ग्रामीण राजकीय व्यवस्था लागु केली.

**ग्रामीण राजकीय व्यवस्थेची रचना**

१. **जिल्हा परिषद :** जिल्हा पातळीवर काम करणारी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे जिल्हा परिषद ही होय. जिल्हा परिषदेची निवड जनतेकडून प्रौढ मतदानाच्या पध्दतीने केली जाते. तिचा पाच वर्षाचा कार्यकाळ आहे.जिल्हा परिषदेसाठी एक जिल्हा अध्यक्ष व उपाध्यक्ष असे दोन कार्यकारी पदे असतात. जिल्हा परिषद प्रामुख्याने जिल्हयामधल्या ग्रामीण भागाचा सर्वांगीन विकास करणारी संस्था आहे.

२. **पंचायत समिती :—** जिल्हयातील प्रत्येक तालुक्याला एक पंचायत समिती असते.पंचायत समितीच्या सभासदांची निवडसुध्दा प्रौढ मतदान पध्दतीने ग्रामीण मतदार करतात. पंचायत समितीचे कार्यकारी कामकाज पाहण्यासाठी एक सभापती व एक उप सभापती अशी पदे असतात.शेती, पशुसंवर्धन, समाजकल्याण, शिक्षण, आरोग्य, दळणवळण,पाणी पुरवठा आदी क्षेत्रात ही समिती कार्य करते.

३. **ग्रामपंचायत :—** राज्यातील ६०० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या प्रत्येक खेडयाला ग्रामपंचायत ही व्यवस्था आहे. प्रौढ मतदानाच्या पध्दतीनुसार ग्रामसभा ग्रामपंचायतीच्या सभासदांची निवड करते. ग्रामपंचायतीचा कार्यकारी कारभार 'सरपंच' व 'उपसरपंच' हे पाहतात. कमीत कमी सात व जास्तीत जास्त १७ सभासदांची ग्रामपंचायत प्रत्येक गावासाठी असते. सन २०१७ पासुन सरपंचाची निवडणुक थेट जनतेमधुन घेण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे.

**ग्रामीण राजकारण :—**

कोणत्याही राजकारणाचा केंद्रबिंदु सत्ता हा असतो. जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या तिनही स्तरावर राजकीय प्रक्रिया घडत असते. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची ४५.२२ टक्के लोकसंख्या शहरी भागात राहते तर ५४.७८ टक्के लोक हे ग्रामीण भागात राहतात. महाराष्ट्रमध्ये सध्या ३३ जिल्हा परिषदा आहेत व ३५५ पंचायत समिती आहेत. तर २८,५५८ ग्रामपंचायत आहेत. आजही ५० टक्के पेक्षा अधिक लोक ग्रामीण भागात राहतात. ग्रामीण राजकरणाची काही वैशिष्टये आहेत एक म्हणजे ग्रामीण राजकारण हे जात, धर्म, घराणे जमिनीची मालकी यावर अधारीत आहे. राखीव जागा मुळे ग्रामीण स्तरावर काही मागास, दलित, स्त्री यांना नेतृत्वाची संधी मिळत आहे. पण याच अर्थाने सत्ता गावातील श्रीमंत व उच्चभ्रु समाजाकडेच आहे. गावची सत्ता आपल्या हाती राहावी म्हणुन हा घटक प्रभावी ठरतो. ग्रामीण राजकारणात आज पैसा, प्रसिध्दी, यांना महत्व येत आहे. यामुळे ग्रामीण राजकरणात गैरप्रकार मोठयाप्रमाणात आहे. भारताचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी म्हटल्याप्रमाने योजनेचा केवळ १५ टक्के पैसा ग्रामीण स्तरापर्यंत जातो त्यामुळे गावचा विकास होत नाही. आज तर